# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

विद्यापीठ विकास विभाग

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५(महा.)
फोन:०७१३२.२२३३२४
Email : bcud.gondwanauniversity@gmail.com
web:unigug.org


जा. क्र/विविवि./ ४३ /२०१९ दिनांक १२/०६/२०१९

## परिपत्रक

विषय :– विद्यापीठाच्या वार्षीक अहवालाकरिता माहीती न सादर करण्या–या महाविद्यालयावर दंडात्मक कार्यवाहीबाबत.

महाविद्यालयांना परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १३६ नुसार विद्यापीठाचा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी महाविद्यालयांकडुन माहिती मागविण्यात येत असते, परंतु ब–यशा महाविद्यालयाकडून वार्षिक अहवालाची माहिती विद्यापीठास प्राप्त होत नाहीत. त्यामूळे वार्षिक अहवाल तयार करण्यास विलंब होतो व वार्षिक अहवालामध्ये महाविद्यालयाच्या माहितीचा समावेश होत नसल्याची बाब मा. व्यवस्थापन परिषदेच्या निर्देशनास आली. त्यामूळे मा. व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १८ मार्च २०१९ रोजी आयोजीत सभेतील बाब क्र. ४१ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

''बैठकीत विद्यापीठाच्या वार्षिक अहवालाकरीता ज्या महाविद्यालयांनी विहीत वेळेवर माहिती सादर केलेली नाही, अशा महाविद्यालयास रू. ५०००/– आर्थिक दंड आणि विद्यापीठ विकास विभागाकडुन नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त केल्याशिवाय सदर महाविद्यालयाचे पुढील सत्राचे परिक्षा फॉर्म स्विकारले जाणार नाहीत.''

तथापी मा. व्यवस्थापन परिषदेनी उक्तप्रमाणे घेतलेल्या निर्णयाची अमलबजावणी सन २०१८–१९ च्या वार्षिक अहवालासाठीच्या माहिती संकलनांबाबत करण्यात येणार असून जी महाविद्यालये वार्षिक अहवालाकरीता माहिती सादर करणार नाहीत, त्यांच्यावर वरीलप्रमाणे दंडात्मक कार्यवाही घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

मा. व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार

उपकुलसचिव (प्र.)
विद्यापीठ विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.